पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
( पूर्वीचे सोलापूर विद्यापीठ ) (Former Solapur University)
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA-2.62)
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
फोन नं. : ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३०० संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
ईमेल - bcudpgbutr@sus.ac.in

**संशोधन विभाग**

विस्तारीत क्रमांक : १२३, १२५

जावक क्र. पुअहोसोविसो/संशोधन विभाग/२०१९/ 2252

दि. 22 MAR 2019

# परिपत्रक

प्रस्तुत विद्यापीठ सर्व संलग्नित संशोधन केंद्र / महाविद्यालयाचे प्राचार्य / संचालक व विद्यापीठातील सर्व संकुले यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, नजीकच्या काळात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार प्रस्तुत विद्यापीठाची पीएच.डी प्रवेश परीक्षा घेण्यात येणार असून त्यानुसार संबंधित मार्गदर्शकांना विद्यार्थी वितरीत करण्यात येणार आहेत. यासंदर्भात भारत सरकारचे दि.११-१७ जुलै, २००९ चे राजपत्र व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. ०६/०७/२०१५, ०४/०९/२०१५ व दि. ०५/०७/२०१६ रोजीच्या पत्रान्वये संशोधन केंद्राबाबतचे नियम, संशोधक मार्गदर्शक यांच्यासाठीच्या अटी तसेच विद्यार्थी वितरीत करण्याबाबतचे नियम विहित करण्यात आले आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या उपरोक्त नियमानुसार ज्या संशोधन केंद्रात संबंधित विषयाचे दोन (०२) संशोधक मार्गदर्शक उपलब्ध आहेत त्या महाविद्यालयाच्या संशोधक मार्गदर्शकाकडील रिक्त जागानुसार विद्यार्थी वितरीत करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे ज्या संशोधन केंद्रात संबंधित विषयाचा एक (०१) संशोधक मार्गदर्शक उपलब्ध आहेत अशा संशोधन केंद्रातील संशोधक मार्गदर्शक तसेच इतर महाविद्यालयामधील संशोधक मार्गदर्शक यांना विद्यापीठातून विद्यार्थी वितरीत करण्यात येणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेमधील कामासाठी काही निवडक महाविद्यालयामधील प्रमाणित प्रयोगशाळा उपलब्ध करुन देण्यात येईल व त्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काचा काही प्रमाणात हिस्सा हा संबंधित महाविद्यालयाकडे वर्ग करण्यात येईल. एकच संशोधक मार्गदर्शक असलेल्या संशोधन केंद्रात यापूर्वी संशोधन करत असलेले विद्यार्थी त्याच संशोधन केंद्रात संशोधन करतील व पूर्वी वितरीत केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची Ph.D. पूर्ण होईपर्यंत त्या संशोधन केंद्राने संलग्नीकरणाचे नुतनीकरण करुन घेणे आवश्यक आहे.

तसेच यापुढील (PET-७ पासून) संशोधनासाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांचे विहित शुल्क विद्यापीठाकडेच जमा करावयाचे असून त्यातील महाविद्यालयाचा हिस्सा (प्रति विद्यार्थी) प्राधिकरणाच्या निर्णयानुसार संबंधित महाविद्यालयांना वितरीत करण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी.

तरी सर्व महाविद्यालये / विद्यापीठ संकुले / संशोधन केंद्र / संशोधक मार्गदर्शक यांनी उपरोक्तप्रमाणे करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची नोंद घ्यावी.

22/03/2019
प्र. कुलसचिव

प्रत :- १. मा. कुलगुरु कार्यालय
२. मा.कुलसचिव कार्यालय
३ मा. संचालक, सर्व संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
४. मा. प्राचार्य/प्राचार्या सर्व मान्यता प्राप्त संलग्नित महाविद्यालय
५. सर्व संशोधक मार्गदर्शक